॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


✽ सुविचार ✽

अहंकार हा माणसाच्या प्रगतीचा मोठा शत्रू आहे.







■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १७ जून २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ६२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### पर्यटकांचे आकर्षण भुशी धरण ओव्हर फ्लो!

● **लोणावळा** - पावसाळ्यात पर्यटकांचे आकर्षण असलेले भुशी धरण हे १६ जून रोजी पहाटेच्या सुमारास ओव्हरफ्लो झाले व परिसरातील व्यावसायिकांनी जल्लोष केला. मागील महिनाभरापासून पडणाऱ्या पावसामुळे धरणात पाण्याचा साठा वाढला होता. लोणावळ्यात रविवारी रात्री ते सोमवारी सकाळ पर्यंत १४३सेमी(५. ६३ इंच) पावसाची नोंद करण्यात आली आहे. सोमवारी सकाळपासूनच सहारा पुल धबधबा व भुशी धरणावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली. सकाळच्या वेळेत धरण ओव्हर फ्लो होऊन वाहू लागल्याने धरणाच्या पायऱ्यांवर बसून भिजण्याचा आनंद पर्यटकांना घेता आला.

### मराठवाड्यात यलो अलर्ट


● **मुंबई** - वेळेआधी दाखल झालेल्या व नंतर काही दिवस शांत असलेल्या मॉन्सूनने जोरदार पुनरागमन केले असून मुंबई कोकणासह राज्यातील काही जिल्ह्यात आज धुवाधार पाऊस झाला. येत्या ४८ तासांत मुंबई, कोकणासह उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता वेधशाळेने वर्तवली आहे. मुंबईसह चार जिल्ह्यात रेड, तर उर्वरित २२ जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे. रविवारी रात्रीपासून कोसळणाऱ्या पावसामुळे आज मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले होते. मुंबईतील अनेक भागात पाणी तुंबल्याने घरी परतताना चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले. गेल्या चोवीस तासात पुण्यातील दुर्घटनेसह विविध ठिकाणच्या घटनांमध्ये राज्यात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. अल्प विश्रांतीनंतर सक्रिय झालेल्या पावसाने शनिवारपासून पश्चिम महाराष्ट्रात जोर धरला होता. मुंबईत रविवारी सायंकाळपासून पावसाने जोर धरला. मुंबई, ठाणे, कल्याण, वसई भागात रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत केले होते. शहरातील परळ, लालबाग, सायन, चेंबूर, कुर्ला, सांताक्रूझ आदी भागात पाणी साठल्याने रस्ते वाहतूक विस्कळित झाली होती. पाणी तुंबल्याने अंधेरी सब वे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. पावसाचा उपनगरीय रेल्वेसेवार, तसेच मेट्रो सेवेवरही पावसाचा परिणाम झाला होता. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात रविवारी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत ६.६ मिमी, तर सांताक्रूझ केंद्रात ५.४ मिमी पावसाची नोंद झाली होती. दरम्यान, मुंबईसह ठाणे, पालघर भागात सोमवारी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# जात जनगणनेसाठी अधिसूचना जारी

## पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू

● **नवी दिल्ली । वीरभूमी-**

गृह मंत्रालयाने सोमवारी जात जनगणनेसाठी अधिसूचना जारी केली आहे. केंद्र सरकार दोन टप्प्यात जात जनगणना करणार आहे. अधिसूचनेनुसार, पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होईल. त्यात हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि लडाख ही ४ डोंगराळ राज्ये समाविष्ट आहेत.



दुसरा टप्पा १ मार्च २०२७ पासून सुरू होईल. यामध्ये देशातील उर्वरित राज्यांमध्ये जनगणना सुरू होईल. त्याआधी रविवारी गृहमंत्री अमित शहा यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत १६ व्या जनगणनेच्या तयारीचा आढावा घेतला. केंद्राने ३० एप्रिल २०२५ रोजी जात जनगणना करण्याची घोषणा केली होती. स्वातंत्र्यानंतर देशातील ही पहिली जात जनगणना असेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले होते की, जात जनगणना मूलभूत जनगणनेसोबतच केली जाईल.

काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष जातीय जनगणनेची मागणी करत आहेत. देशातील शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. ती दर १० वर्षांनी केली जाते. त्यानुसार, पुढील जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोविड-१९ साथीच्या आजारामुळे ती पुढे ढकलण्यात आली.

मनमोहन सिंग सरकारच्या काळात २०११ मध्ये सामाजिक-आर्थिक आणि जातीय जनगणना करण्यात आली होती. ती ग्रामीण विकास मंत्रालय, शहरी विकास मंत्रालय आणि गृह मंत्रालयाने केली होती. तथापि, या सर्वेक्षणाचा डेटा कधीही सार्वजनिक केला गेला नाही. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वेबसाइटवर फक्त एससी-एसटी कुटुंबांचा डेटा प्रसिद्ध करण्यात आला आहे. १९४८ च्या जनगणना कायद्यात एससी-एसटींची गणना करण्याची तरतूद आहे. ओबीसींची गणना करण्यासाठी त्यात सुधारणा करावी लागेल. यामुळे ओबीसीच्या २,६५० जातींचा डेटा उघड होईल. २०११ च्या जनगणनेनुसार, १,२७० एससी आणि ७४८ एसटी जाती आहेत. २०११ मध्ये एससी लोकसंख्या १६.६% आणि एसटी ८.६% होती.

### जनगणनेच्या फॉर्ममध्ये २९ कॉलम

■ २०११ पर्यंत, जनगणनेच्या फॉर्ममध्ये एकूण २९ कॉलम होते. यामध्ये नाव, पत्ता, व्यवसाय, शिक्षण, रोजगार आणि स्थलांतर असे प्रश्न समाविष्ट होते आणि फक्त अनुसूचित जाती आणि जमातीच्या प्रवर्गातील प्रश्नांची नोंद केली जात होती. आता जातीय जनगणनेसाठी त्यात अतिरिक्त कॉलम जोडता येतील.

### कायद्यात सुधारणा करावी लागेल

■ १९४८ च्या जनगणना कायद्यात एससी-एसटींची गणना करण्याची तरतूद आहे. ओबीसींची गणना करण्यासाठी त्यात सुधारणा करावी लागेल. यामुळे ओबीसीच्या २,६५० जातींचा डेटा उघड होईल. २०११ च्या जनगणनेनुसार, १,२७० एससी आणि ७४८ एसटी जाती आहेत. २०११ मध्ये एससी लोकसंख्या १६.६% आणि एसटी ८.६% होती.

# वारकऱ्यांना टोलमाफी, शासनाकडून निर्णय जारी

● **मुंबई । वीरभूमी-**

वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. १८ जून ते १० जुलै दरम्यान वारकऱ्यांना ही टोलमाफी दिली जाणार आहे. १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गावर टोलमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांना टोल माफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. १८ जून ते १० जुलैदरम्यान पालखी मार्गावर वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार आहे. १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गांवर सरकारने टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. शासनाच्या निर्णयानुसार टोल नाक्यावर वारकरी, मानाच्या पालख्या आणि भाविकांना टोलमाफी मिळणार आहे. जड आणि हलक्या वाहनांना या टोलमाफीचा फायदा होणार आहे.

दरवर्षी लाखो वारकरी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला जात असतात. विठ्ठल नामाचा जयघोष करत हे वारकरी दिंड्या घेऊन पंढरपूरला जातात. पंढरपूरला आषाढी एकादशीच्या दिवशी अभूतपूर्व असा सोहळा पाहायला मिळतो. वारकऱ्यांसाठी हा खास सोहळा असतो. वर्षभर वारकरी या क्षणाची वाट पाहात असतात.

दरम्यान या वारकऱ्यांना टोलमाफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या निर्णयानुसार पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार आहे. मानाच्या पालख्या आणि भाविकांना टोलमाफी मिळणार आहे. जड आणि हलक्या वाहनांना या टोलमाफीचा फायदा होणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. १८ जून ते १० जुलै दरम्यान वारकऱ्यांना ही टोलमाफी दिली जाणार आहे. १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गावर टोलमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे वारकऱ्यांना आता या मार्गावर कुठलाही टोल भरावा लागणार नाही यामुळे वारकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# संत तुकाराम महाराज पालखीचे बुधवारी पंढरपूरकडे प्रस्थान

● **पुणे । वीरभूमी-**

श्री क्षेत्र आळंदी आणि श्री क्षेत्र देहू येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे पालखी सोहळा प्रस्थान ठेवण्यासाठी दोन दिवस शिल्लक असून बुधवार दि. १८ जून रोजी श्री जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा तर गुरूवार दि. १९ जून रोजी आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. यानिमित्ताने देहू आणि आळंदी संस्थान, पोलिस प्रशासन, स्थानिक महापालिका नगरपरिषद यांच्याकडून तयारीचा आढावा घेतला जात आहे. श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने पालखी सोहळा तयारीच्या कामांचा आढावा घेतला जात आहे. पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे, वैभव महाराज मोरे व गणेश महाराज मोरे, संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त लक्ष्मण महाराज मोरे, उमेश महाराज मोरे व विक्रमसिंह महाराज मोरे आदी तयारीवर लक्ष ठेवून आहेत. देहू येथून १८ जूनला दुपारी श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. पालखी सोहळ्यात राज्यातील व देशभरातील मंडळींसह लाखो वारकरी, भाविक सहभागी होतात.

# मराठा आरक्षणासाठी जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

● **बीड । वीरभूमी-**

मराठे आणि कुणबी एकच असून राज्यातील सर्व मराठा समाजाला आरक्षण द्यावं, अशी मागणी ते करत आहेत. मात्र सरकार आमच्याकडे लक्ष देत नाही, असे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. तसेच जरांगे यांनी सरकारला यावेळी २९ ऑगस्टपर्यंत काहीही बोलणार नाही परंतु मुंबईला आलो तर परत जाणार नाही, असा थेट अल्टिमेटम दिला आहे.

दरम्यान, मनोज जरांगे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी मराठा आरक्षण तसेच त्यांची आगामी रणनीती याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. मी महाराष्ट्रातील सर्व आमदारांना १४ जून रोजीपासून फोन करणार आहे. आम्ही प्रत्येक आमदाराला अंतरवाली सराटीमध्ये बोलवणार आहोत. विधानपरिषदेच्या आमदारांनाही आम्ही बोलवणार आहोत. यात आजी-माजी आमदार, खासदारही असतील. मराठा आणि कुणबी एक आहे. त्याच्या नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे मराठा आणि कुणबी एक असल्याचा कायदा पारित करावा. सगेसोयरे मुद्द्याची अंमलबजावणी करावी, अशा मागण्या आम्ही त्यांना करणार आहोत.

मी २९ ऑगस्टपर्यंत मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांना एकही शब्द बोलणार नाही. आजपासून तीन महिने मी कोणालाही काहीही बोलणार नाही. येत्या ३० जूनच्या अधिवेशनात आमचा विषय मार्गी लावा. आम्ही गुलाल घेऊन येतो. पण २९ ऑगस्टला आम्हाला मुंबईत यायची वेळ येऊ देऊ नका. आम्हाला आरक्षण दिलं नाही तर मी यावेळी मुंबई सोडणार नाही. माझ्या समाजाने वाशी येथून परत जाऊन तुम्हाला वेळ दिला होता. आता मात्र आम्ही वापस जाणार नाहीत. आमची अडवणूक करू नका, आमची फसवणूक करू नका. आमची मुले फाशी घेत आहेत.

सोपा विषय आहे. आमच्या नावावर सातबारा असेल तर शेत मोजून देण्याची जबाबदारी तुमची आहे. आमच्या कुणबी असल्याच्या नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे आम्हाला आरक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात प्रवेश करताना संत निवृत्तीनाथ महाराज दिंडीचे अभूतपूर्व स्वागत

## मा. आ. डॉ. सुधीर तांबे व इंद्रजीतभाऊ थोरात यांनी केले भव्य स्वागत । माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून वारकऱ्यांसाठी सुविधा

● **संगमनेर । वीरभूमी-**

शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे आज अहिल्यानगर जिल्ह्यात आगमन झाले. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली अमृत उद्योग समूहाच्या वतीने वारकऱ्यांची सर्व सुविधा करण्यात आली असून रिमझिम पाऊस व अत्यंत भक्तिमय वातावरणात नाशिक पदवीधर मतदारसंघाचे मा. आ. डॉ सुधीर तांबे व इंद्रजीत भाऊ थोरात यांच्यासह गावकऱ्यांनी या पालखीचे अभूतपूर्व स्वागत व पूजन केले.

पारेगाव बु. येथे पंढरपूरसाठी निघालेल्या या पालखीचे सुमारे २० हजार वारकऱ्यांसमवेत आगमन झाले. यावेळी माजी आ. डॉ. सुधीर तांबे व इंद्रजीत भाऊ थोरात यांनी पालखीचे पूजन केले याप्रसंगी समवेत निवृत्तीनाथ देवस्थानचे अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर, अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक देविदास ढूमने, ॲड. त्र्यंबकराव गडाख, साहेबराव गडाख, दौलत गडाख, सोमनाथ गडाख, सचिन गडाख, बी. आर. चकोर, नवनाथ आरगडे, विजय राहणे आदींसह विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

रिमझिम पावसात सुमारे २० हजार वारकरी या दिंडीमध्ये सहभागी झालेले आहेत. मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने या वारकऱ्यांनी हरिनामाचा गजर करत टाळ मृदुंगाच्या तालावर विविध अभंग गात जिल्ह्यात प्रवेश केला. अश्विनाथ विद्यालयाचे लेझीम पथक, पारंपारिक वाद्य व वेशभूषा करून गावकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी या पालखीचे स्वागत केले.

यावेळी बोलताना मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, संत निवृत्तीनाथ महाराज पालखीला मोठी परंपरा आहे दरवर्षी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात हे जिल्ह्यात प्रवेश करताना या पालखीचे स्वागत करतात.महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे .वारकरी संप्रदाय हा हजारो वर्षांपूर्वीच असून सर्वांना सोबत घेऊन जाणारा आहे. जात-पात धर्म हा कोणताही भेदभाव या संप्रदायात नाही. असा हा सांस्कृतिक सोहळा जगासाठी आदर्शवत असल्याचे ते म्हणाले



इंद्रजीत भाऊ थोरात म्हणाले की, विठ्ठलाची पायी वारी ही महाराष्ट्राची मोठी संस्कृती असून यामध्ये गोरगरीब लहान थोर सर्व सहभागी झालेले असतात. भेदभाव विसरून एकत्र येऊन आनंदाने तल्लीन होऊन पांडुरंगाच्या चरणी लीन होतात. ही महाराष्ट्राची मोठी सांस्कृतिक व धार्मिक परंपरा असून यावर्षीही राज्यात भरपूर पाऊस पडू दे शेतकरी सुखी होऊ दे अशी प्रार्थना ही त्यांनी यावेळी केली.

विविध वारकऱ्यांनी फुगडी खेळत डोक्यावर तुळशी वृंदावन घेत सर्वांच्या समवेत अभंग गायले हरिनामाचा गजर आणि भक्तिमय वातावरणाने सर्व परिसर दुमदुमून गेला होता.

### काँग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून वारकऱ्यांसाठी सर्व सुविधा

■ जिल्ह्यात प्रवेश करताना दरवर्षी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात उपस्थित राहून पालखीचे स्वागत करतात. ते दिल्लीत असल्याने त्यांनी यावेळी त्यांनी दूरध्वनी वरुन वारकरी व गावकरी यांच्याशी संवाद साधला. तसेच वारकऱ्यांसाठी एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून ॲम्बुलन्स, अमृत उद्योग समूहातील संस्थांच्या माध्यमातून वारकऱ्यांसाठी राहण्याची सुविधा, पिण्याच्या पाण्याचा टँकर, दवाखाना, लाईट यांसह सर्व सुविधा उपलब्ध करून देताना संगमनेर तालुक्यातून दिंडी जाऊपर्यंत सर्व सुविधा पुरविण्याच्या सूचना यशोधन व अमृत उद्योग समूहाला दिले असून इंद्रजीत भाऊ थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांना सर्व सुविधा देण्यात आले आहेत.

## SPOT NEWS



## सिद्धार्थनगर परिसरातील नागरिकांनी दिले आ. जगताप यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सिद्धार्थनगर परिसरात अनेक वर्षापासून हा परिसर नागरी सुविधा पासून वंचित असल्याने नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देताना सिद्धार्थनगर परिसरातील रहिवासी अंकुश मोहिते समवेत दिव्या पवार, चंदा वैराळ, ज्योती काळे, गायत्री ससाने, माया वैरागर, अनिता कांबळे, छबु बुलाखे, पायल भालेराव, ज्योती शेंडगे, मंगल भागवत, इंदुबाई खुडे, कल्पना काते, संगीता नन्नवरे, काजल रोकडे, संजू डाके, विशाल पाटोळे, विशाल भालेराव, आकाश पवार, प्रभाकर लोखंडे, राम भास्कर आदीसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, सिद्धार्थनगर परिसरात अनेक वर्षापासून रहिवासी असून नागरी सुविधा पासून वंचित आहे. आमच्या भागात गटार व रस्त्याची दुरावस्था झालेली आहे तसेच घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून पावसाळ्याच्या दिवसात मलेरिया, डेंगू अनेक आजारे निर्माण होण्याची शक्यता असल्याने लवकरात लवकर सिद्धार्थनगर भागातील नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले आहे.

## १८ जुन रोजी ‘जागेवर निवड संधी’ उपक्रमाचे आयोजन

**● अहिल्यानगर । प्रतिनिधी–**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,अहिल्यानगर येथे नोकरी इच्छुक उमेदवारांकरीता ‘जागेवर निवड संधी’ उपक्रमाचे १८ जून २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजन करण्यात आले आहे. इच्छूक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पुर्ण करून रोजगाराच्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे. ‘जागेवर निवड संधी’ या उपक्रमामध्ये जिल्ह्यातील दोन उद्योजक सहभागी होऊन प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करणार आहेत. या उपक्रमात एच.एस.सी., आय.टी.आय., पदवी, पदव्यूत्तर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांना जागेवर नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापपर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. तसेच लॉगीन करुन शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी आवेदन सादर करावे. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र प्रशासकीय इमारत, पहिला मजला, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात. तसेच www.ncs.gov.in या संकेतस्थळावर जास्तीत जास्त उमेदवांनी सहभाग नोंदवावा व संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी समन्वयक वसीमखान पठाण यांच्याशी ९४०९५५५४६५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# विद्यालयासमोरील अवैध दारु विक्री बंद करा

### सामनगाव ग्रामपंचायतीचे शेवगाव पोलिस निरीक्षकांना निवेदन । तरुण मुले जातात व्यसनाच्या आहारी!

**● शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव तालुक्यातील सामनगाव येथे मुख्य राज्यमार्गावरील तसेच विद्यालयासमोर अवैध दारु विक्री खुलेआम सुरु आहे. यामुळे गावातील अनेक तरुण मुले या व्यसनाच्या आहारी गेले आहेत. त्यातून अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. आता शाळकरी मुले देखील व्यसनाधीन बनल्याने रोज छोटे मोठे वाद होत आहेत. याबाबत पोलीस प्रशासनाने वेळीच दखल घेऊन खुलेआम सुरु असलेल्या अवैध दारु विक्रीचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सामनगाव ग्रामपंचायतीच्या वतीने शेवगावचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.




याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव तालुक्यातील सामनगाव गावामध्ये अवैध दारु व विक्री व्यवसाय राजरोसपणे सुरु आहेत. या दारुमुळे तरुण –वृध्द व्यसनाधिन झाले आहेत. या व्यवसायामुळे गावातील महिलांना सुरक्षीत वातावरण राहीलेले नाही. गावामधील घरांघरांमध्ये वाद होत असल्याने महिलावर्गांचे संतुलन बिघडले आहे. तसेच गावातील अनेक व्यवसायावर विपरीत परिणाण झाला आहे. गावातील अवैध दारु व्यवसाय बंद होणे गरजेचे आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालयाच्या आडोशाला व गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या जलकुंभाखाली जुगार खेळणारांची संख्या वाढली आहे. या अवैध व्यवसायांचा त्वरीत बंदोबस्त न केल्यास ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा निवेदनाव्दारे दिला आहे.

ग्रामपंचायतच्या वतीने अवैध दारु बंद करण्याचा ठराव करण्यात आला असून तो या निवेदनाबरोबर देण्यात आला आहे. यावेळी सरपंच आदिनाथ कापरे, उपसरपंच प्रमोद कांबळे, ग्रामपंचायत सदस्य कृष्णा सातपुते, देवदान कांबळे, अरुण काळे, मार्तंड नजन, लाला शेख आदी उपस्थित होते. निवेदनाची प्रत पोलीस अधिक्षक, तहसील कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, गटविकास अधिकारी आदींना देण्यात आली आहे.

दरम्यान, काल रविवार दि. १५ रोजी काही टारगटांनी गावातील प्राथमिक शाळेमध्ये लावलेले वृक्ष व इतर साहित्यांची मोडतोड केली. तर सारपे वस्तीवरील प्राथमिक शाळेतील खोलीचे कुलूप तोडून तांदुळ व इतर साहित्याची चोरी केली. विद्यार्थ्यांनी वर्षभर पाणी घालून वाढवलेल्या झाडांची कत्तल केल्याने पालकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. आज सोमवार दि. १६ रोजी पहिल्याच दिवशी मुलांना व शिक्षकांना हा प्रकार पहायला मिळाला. याबाबत ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने शेवगाव पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली असून या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## श्रीगोंदा पोलिसांची गुन्हेगार उमेश वेताळ याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई



**● श्रीगोंदा । प्रतिनिधी–**

श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुख्यात गुन्हेगार उमेश शिवाजी वेताळ (वय २९, रा. लिंपणगांव, ता. श्रीगोंदा) याला महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत एक वर्षासाठी नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

उमेश वेताळ हा लिंपणगांव आणि श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बळाचा आणि दहशतीचा वापर करून लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत होता. त्याने घातक शस्त्रांचा वापर करून जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, दहशत पसरवणे आणि चोरट्या मार्गाने गुटखा विक्रीसारखे गंभीर गुन्हे केले. त्याच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कृत्यांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता होती. याबाबत श्रीगोंदा पोलिसांनी पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांच्या आदेशानुसार एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे सादर केला. प्रस्तावाची सखोल चौकशी करून जिल्हाधिकाऱ्यांनी वेताळ याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वेताळ याला पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले आणि पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोहर खिळदकर, गुन्हे शोध पथकातील पोलीस नाईक संग्राम जाधव, पोलीस अंमलदार संदीप शिरसाठ, संदीप राऊत, अमोल मरकड, राजेश जाधव आणि गोरख जाधव यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## बारी येथे उभारणार आदिवासी हृद्यसम्राट स्व. मधुकरराव पिचड यांच्या नावाचे भव्य प्रवेशद्वार उभारणार

**● अकोले । वीरभूमी–**

राज्याचे माजी आदिवासी मंत्री, तथा आदिवासी हृद्यसम्राट स्व. मधुकरराव पिचड यांच्या नावाचे भव्य प्रवेशद्वार लोक सहभागातून कोल्हार घोटी राज्यमार्गावरील अकोले तालुक्याची हद्द असलेल्या ‘बारी’ येथे उभारण्याचा निर्णय समस्त आदिवासी समाज तसेच अकोले तालुक्यातील सर्व समाज बांधव व महाराष्ट्र राज्यातील स्व.पिचड यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांनी घेतला असल्याची माहिती आदिवासी उन्नती सेवा मंडळाचे अध्यक्ष भरत घाणे व कळसुबाई देवस्थान ट्रस्ट चे उपाध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, माजी सरपंच तुकाराम खाडे यांनी दिली.



यावेळी आदिवासी उन्नती सेवा मंडळाचे अध्यक्ष भरत घाणे, कळसुबाई देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजर समिती संचालक, माजी सरपंच तुकाराम खाडे, अनंत घाणे, सुरेश गभाले, चिंधु झडे, चिंधु पांढरे, नरहरी इदे, दत्ता ढगे, बाजीराव संगभोर, पांडुरंग खाडे, सुनील सारुक्ते, संतोष सोडणर, भास्कर पाटील बुळे, मारुती बांडे, मदन खाडे, हरी पदमेरे, भाऊराव भांगरे, भीमा अवसरकर, मच्छिन्द्र खाडे, संपत झडे, अमृता झडे, भगवंत झडे, सागर रोंगटे, रामदास पिचड, किसन अंबवणे, अशोक भोजने, पढरी खाडगीर, विजय पदमेरे व इतर समाज बांधव उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड साहेब यांचे कार्य हे राज्याला दिशा देणारे आहे. त्यांनी अकोले तालुक्याची ओळख राज्यालाच नव्हेतर देशाला करून दिली. पाणीदार आमदार, जलनायक म्हणुन त्यांची ओळख आहे. अकोले तालुका त्यांच्या माध्यमातून बागायती झालेला आहे. उत्तर नगर जिल्ह्यालाच नव्हेतर मराठवाडा, नाशिक जिल्ह्याला वरदान ठरलेले निळवंडे धरणाचे सर्व श्रेय स्व. पिचड साहेब यांना आहे. आदिवासी समाजाबरोबर बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम पिचड साहेब यांनी केले आहे. दुग्ध क्रांतीचे जनक सुद्धा त्यांचा म्हणावे लागेल.तालुक्याची कामधेनु असलेल्या अगस्ति सहकारी कारखान्याची निर्मिती हे त्यांच्या जीवनातील महत्वपूर्ण ध्येय होते. अशा या व्यक्तिमत्वाची सदैव आठवण व त्यांच्या कामातून प्रेरणा मिळत राहण्यासाठी व भावी पिढीला त्यांची कारकीर्द माहिती व्हावी।म्हणून त्यांच्या नावाचे लोक सहभागातून भव्य प्रवेशद्वार उभारण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

# लाड पागे समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करा

### अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी दिले निर्देश

**● अ. नगर । वीरभूमी –**

सफाई कामगारांच्या हक्कासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या लाड पागे समितीच्या शिफारशींची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. याअंतर्गत प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढून कामगारांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी दिले.

महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित बैठकीत ॲड. लोखंडे बोलत होते. बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त डॉ.संतोष टेंगळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन धस, सहायक आयुक्त सपना वसवा, अशोक साबळे, निखिल फराटे, मेहेर लहारे, जल अभियंता परिमल निकम, शहर अभियंता मनोज पारखे, पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता गणेश गाडलकर, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, कामगार अधिकारी धनंजय शित्रे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, श्याम गोरलकर, शहाजहान तडवी आदी उपस्थित होते.

श्री. लोखंडे म्हणाले, कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व सवलती द्याव्यात, कामगारांना किमान वेतन मिळेल याची दक्षता घ्यावी. सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, मास्क आदी सुरक्षा साधने तात्काळ पुरविण्यात यावेत. कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी. रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा. शहरातील झोपडपट्टी भागात आवश्यक त्या सर्व सोयी–सुविधा पुरविण्याच्या सूचनाही ॲड. लोखंडे यांनी यावेळी दिल्या.

लाड पागे समितीच्या शिफारशीअंतर्गत दोन कर्मचाऱ्यांच्या वारसांना ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचे प्रदान करण्यात आले. विनोद नेटके व सौरभ भोसले या वारसांना नियुक्तीपत्र प्रदान करत चांगले काम करा, असेही ॲड. लोखंडे म्हणाले.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## डॉ. घायतडकर समाज भूषण तर हर्षा पाटील महिला नारी शक्ती पुरस्काराने सन्मानित

● **कोपरगाव । प्रतिनिधी–**

गेल्या अनेक वर्षापासून डॉ. घायतडकर पाटील डेंटल हॉस्पिटल व अशोकराव घायतडकर पाटील सेवाभावी संस्थेमार्फत आरोग्य शिबिर, रक्त तपासणी शिबिरे, मोफत दंत रोग तपासणी व अल्प दरात उपचार, मुख कॅन्सर निदान शिबिरे, वृक्षारोपण, धार्मिक सण उत्सव आदी क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करत असलेले डॉ. कुणाल अशोकराव घायतडकर यांना सरपंच सेवा संघाच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तर महिलांप्रती नेहमीच आदराची भावना असलेल्या महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाच्या समृद्धी शहरस्तर या संस्थेमार्फत वेगवेगळ्या माध्यमातून महिलांना व्यवसाय निर्मितीसाठी शासनाच्या नियमाप्रमाणे बँकेच्या वतीने कर्ज पुरवठा करत बचत गटातील महिलेला स्वावलंबी बनवण्यासाठी अहोरात्र धडपड करत असलेल्या कोपरगाव समृद्धी शहर स्तर संघाच्या व्यवस्थापक सौ.हर्षा बाळकृष्ण पाटील यांना महिलां नारीशक्ती सन्मान या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. अहिल्यानगर येथे स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळ्यात आदर्श पाटोदा गावचे सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या हस्ते तसेच सरपंच सेवा संघाचे मार्गदर्शक यादवराव पावसे, प्रसिद्ध युवा महिला कीर्तनकार हभप. जयश्रीताई तिंकाडे महाराज, संघाचे संस्थापक तथा सरपंच संघटित चळवळीचे नेते बाबासाहेब पावसे, प्रदेशाध्यक्ष रोहित पवार, अमोल शेवाळे, रविंद्र पवार, सुजाता कासार, रवींद्र पावसे आदी प्रमुख मान्यवरांच्या तसेच सरपंच सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

## जलयुक्तच्या कामांमुळे जिरेवाडीचा पाण्याचा प्रश्न सुटणार : आंधळे

● **पाथर्डी । वीरभूमी –**

जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून, जिरेवाडी गावात गाळमुक्त धरण व बंधारा खोलीकरणाची कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष मुकुंद आंधळे यांनी दिली आहे. मुकुंद आंधळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेल्या बंधारा नंबर एकचे ३५० मीटर खोलीकरण करण्यात आले असल्याने, जिरेवाडी व सोनोशी या दोन्ही गावांतील शेतकऱ्यांना शेतात येजा करण्यासाठी रस्ते तयार करण्यात आले आहेत. अनेक वर्षांपासून शेतात येण्या जाण्यासाठी रस्ते नसल्याने मोठी अडचण होती. आता रस्त्यांसह पाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे शेतकऱ्यांनी मुकुंद आंधळे व ग्रामपंचायत सदस्य नवनाथ आंधळे यांच्या प्रती आभार व्यक्त केले आहेत. याकामी, आमदार मोनिका राजळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता आनंद रुपनर व नाम फाऊंडेशनचे संग्राम खलाटे यांचे मोठे सहकार्य लाभल्याचे, मुकुंद आंधळे यांनी सांगितले. तसेच, या कामासाठी सरपंच सौ. लक्ष्मीबाई आंधळे, उपसरपंच रंजना कचरे, विष्णू आंधळे, राजेंद्र बडे, प्रकाश आंधळे, अनिल आंधळे, नवनाथ आंधळे, नारायण (नाना) आंधळे व अण्णासाहेब पवळे, यांचेही सहकार्य लाभले.

# आदिवासी भागात तातडीने युरिया खते उपलब्ध करून द्या

## अनंत घाणे व शेतकऱ्यांची अकोले तहसीलदार व कृषी विभागाकडे मागणी

● **अकोले । वीरभूमी–**

सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असून,भात लागवडीसाठी युरिया खताची मोठी गरज भासत आहे. मात्र, काही दिवसांपासून युरिया खतांचा तुटवडा भासत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वेळेवर खत न मिळाल्यामुळे पेरण्यांमध्ये विलंब होत असून, याचा थेट परिणाम शेतमालाच्या उत्पादनावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खते उपलब्ध करून देण्यात यावी राहू मागणी शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते अनंत घाणे यांनी केली आहे.



माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार शेतकरी अनंत महादु घाणे यांनी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, कृषी विकास अधिकारी श्री. शिंदे , कृषी अधिकारी श्री. गिरी पंचायत समिती कृषी अधिकारी रत्नमाला शिंदे, श्री. गोसावी यांच्याशी संपर्क साधून युरिया खत तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली व जिल्हा अधिकारी यांचा बफर स्टॉक तात्काळ वाटप करण्याची विनंती केली. आदिवासी भागात अगोदर अवकाळी पाऊस आणि आता सुरू झालेला पाऊस यामुळे दळणवळणाची अपुरी साधने जोरदार पाऊस सुरू झाला तर तुटणारा संपर्क यामुळे शेतकऱ्यांना खते नेण्यास मुश्किल होईल यासाठी तात्काळ खतांचे वाटप करावेत शासन व कृषी विभागाचे लक्ष वेधुन तात्काळ युरिया खत उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली आहे,त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, खत वेळेवर न मिळाल्यास उत्पादनावर गंभीर परिणाम होतो. परिणामी शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडतात.

यावेळी शेतकरी, अनंत घाणे, तुकाराम खाडे, बाजीराव सगभोर, सुनील पवार, सागर रोंगटे, एकनाथ सारुक्ते, तुकाराम सारुकते, वसंत सोनवणे, निवृत्ती पोकळे, कुशाबा पोकळे, सुरेश गभाले, मारूती खाडे, राजू भारमल सह आदिवासी भागातुन मागणी केली आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत पाहणी करून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

### कृषी केंद्रांनी फलकावर स्टॉक लिहावा

■ युरिया खताचा तुटवडा दिवसेंदिवस गंभीर बनत आहे, वेळेवर खत न मिळाल्यास पेरण्या रखडणार असून याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादनावर होणार आहे. परिसरातील शेतकऱ्यांच्या हितासाठी हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे, स्थानिक प्रशासनाने लवकरात लवकर योग्य ती कारवाई करून युरिया खताची उपलब्धता करावी, कृषी सेवा केंद्रानी फलकांवर खतांचा स्टॉक लिहावा. बोगस बियाणे खते व इतर औषधे शेतकऱ्यांच्या माथी मारू नयेत, अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची मागणी आहे.

## छत्रपती महाविद्यालयात दोन दिवशीय कॅम्पस मुलाखतींचे आयोजन

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्लेसमेंट सेलमार्फत २० व २३ जून २०२५ रोजी दोन दिवशीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. मुंबई, रांजणगाव (पुणे) आणि सुपा औद्योगिक वसाहतीतील ५ नामवंत कंपन्यांचे अधिकारी लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड करणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी दिली.

स्व. बापूंच्या 'विद्यार्थ्यांच्या हाताला काम मिळवून देणारी अमृतवाहिनी' या विचाराने प्रेरित होऊन, राजेंद्रदादा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. कॉलेजचा प्लेसमेंट विभाग २५ हून अधिक कंपन्यांच्या संपर्कात असून, २० पेक्षा जास्त कंपन्यांशी सामंजस्य करार झाले आहेत. २० जून २०२५ रोजी रांजणगाव येथील हाएर पलियनसेस इंडिया लि., फियाट इंडिया ऑटोमोबाईल आणि सुपा येथील यु.के.बी. इलेक्ट्रॉनिक्स व मिडीआ इंडिया लि. या कंपन्यांमध्ये पदवीधारकांसाठी मुलाखती तर २३ जून २०२५ रोजी मुंबई येथील एडवेंट केंबिओ प्रा. लि. येथे एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) विद्यार्थ्यांसाठी मुलाखती होणार आहेत. या मुलाखतींसाठी कला, विज्ञान, वाणिज्य, आय.टी.आय. आणि संगणक शाखेतील पदवी उत्तीर्ण किंवा २०२४-२५ मध्ये अंतिम वर्षाची परीक्षा दिलेले विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

तरी इच्छुक उमेदवार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नावनोंदणी करावी आणि २० किंवा २३ जून रोजी सकाळी ९ वाजता मूळ कागदपत्रांसह महाविद्यालयात उपस्थित राहून प्रत्यक्ष नावनोंदणी करावी. संस्थेचे विश्वस्त, निरीक्षक आणि प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## नाटेगांव सरपंचपदी कोल्हे गटाचे गणेश मोर



● **कोपरगाव । प्रतिनिधी–**

तालुक्यातील नाटेगांव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कोल्हे गटाचे गणेश आप्पासाहेब मोरे यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल त्यांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी अभिनंदन केले आहे.

निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून मच्छिंद्र पोकळे व सहायक म्हणुन ग्रामसेवक सिध्दार्थ काळे यांनी काम पाहिले, श्री. गणेश मोरे यांच्या नावाची सुचना जयवंत बाबासाहेब मोरे यांनी केली.

नवनिर्वाचित सरपंच गणेश आप्पासाहेब मोरे यांचा यावेळी सत्कार करण्यांत आला. सत्कारास उत्तर देतांना ते म्हणाले की, युवानेते विवेक भैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली नाटेगांव ग्रामपंचायत अंतर्गत विविध जनविकासाच्या योजना राबवुन गांवचा कारभार आदर्श करण्यावर भर देऊ.

याप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सर्वश्री. त्रंबकराव सरोदे, कोपरगांव बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम, डी. पी. मोरे, रामदास मोरे, डॉ गोरक्षनाथ मोरे, राजेंद्र मोरे, नारायण मोरे, आप्पासाहेब मोरे, दगु मोरे, रामनाथ मोरे, शरद मोरे, बाबासाहेब मोरे, जयराम मोरे, ताराचंद मोरे, दत्तात्रय मोरे, गोरख मोरे यांच्यासह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. शेवटी ग्रामसेवक सिध्दार्थ काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्रीगोंदा तालुका संभाजी ब्रिगेडच्या नव्या निवडी जाहीर

## श्रीगोंदा व कर्जत तालुका संभाजी ब्रिगेडची आढावा बैठक उत्साहात

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड यांच्या श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक शनिवारी संपन्न झाली. या बैठकीस मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, जिल्हा कार्याध्यक्ष बी. के. महाडिक, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, महिला जिल्हाध्यक्ष राजश्री शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राऊत, शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष दिलीप वाळुंज, संभाजी ब्रिगेडचे दत्ता भोसले, सुनील पवार, जिजाऊ ब्रिगेडच्या उज्वला शेळके, प्रतिमा पवार, जिल्हा उपाध्यक्ष विशाल मांडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



यावेळी राजेश परकाळे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आगामी निवडणुकीसाठी गाव तिथे शाखा सुरू करण्याच्या उद्देशाने कार्याला गती द्यावी लागेल. संभाजी ब्रिगेड गेली वीस वर्षे पुरोगामी विचार आणि महापुरुषांचा संघर्षमय वारसा घेऊन कार्यरत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी लवकरच जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन केले जाईल. या मेळाव्यात तालुक्यातील विविध प्रश्नांवर चर्चा करून निर्णायक भूमिका घेतली जाईल, असे त्यांनी नमूद केले. यावेळी नव्याने सामील झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत आणि कठीण काळात लढणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी श्रीगोंदा तालुक्यासाठी पुढीलप्रमाणे पदांची निवड करण्यात आली. तालुका कार्याध्यक्षपदी सौरभ शितोळे, तालुका संघटक कृष्णा जगताप, तालुका उपाध्यक्ष बापू जगताप, अल्पसंख्यांक आघाडी तालुकाध्यक्ष सद्दाम शेख, उद्योजक आघाडी तालुकाध्यक्ष राजेंद्र गव्हाणे, शेतकरी आघाडी उपाध्यक्ष नवनाथ कंद, शेतकरी आघाडी कार्याध्यक्ष पदी पांडुरंग खोरे यांच्या निवडी करण्यात आल्या.

या बैठकीचे आयोजन श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजि. शाम जरे, तालुका उपाध्यक्ष दिलीप लबडे आणि कर्जत तालुकाध्यक्ष वैभव लाळगे यांनी केले. यावेळी जिल्हा मराठा पतसंस्थेचे संचालक कालिदासजी शिंदे, सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक रामदास काळदाते, सकल मराठा समाजाचे समन्वयक रावसाहेब धांडे, श्रीगोंदा तालुका संभाजी ब्रिगेड मुख्य सचिव सुयोग धस, उपाध्यक्ष रवींद्र महांडूळे, संदीप जगताप, संघटक संतोष आरडे, कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष घनशाम काळे, शेतकरी आघाडीचे तालुकाध्यक्ष उत्तम घोगरे, सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष बापुराव शिंदे, कर्जत तालुका माजी जिल्हा उपाध्यक्ष राहुल नवले, जिजाऊ ब्रिगेड तालुकाध्यक्ष उज्वला शेळके, रोहन गांगर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कोपरगाव ग्रामीण रुग्णालयाच्या घटनेची शहनिशा करून दोषींवर कारवाई करा : आ. आशुतोष काळे

● **कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या गर्भवती महिलेला पुढील उपचारार्थ दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी रुग्णवाहिका सेवा देण्यात हलगर्जीपणा करण्यात आला असल्याची माहिती प्रसिद्धी माध्यमातून समोर आली आहे. कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात रुग्ण सेवेच्या बाबतीत जर असे प्रकार होत असेल तर ते अतिशय गंभीर आहे. त्यामुळे कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात घडलेल्या घटनेची शहानिशा करून आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना केल्या आहेत.



कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात मोफत उपचार होतील या आशेवर आलेल्या गर्भवती महिलेची तपासणी केल्यानंतर त्या महिलेला पुढील उपचार करण्यासाठी लोणी येथील रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला होता. परंतु त्या महिलेला लोणी येथील रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णवाहिकेला फोन करण्यास परिचारिकेने असमर्थता दर्शवून मी फोन लावणार नाही असा पवित्रा घेतला. रुग्णालयाच्या इतर कर्मचाऱ्यांनी देखील उडवा उडवीची उत्तरे देवून रुग्णवाहिका उपलब्ध असतांना देखील त्या गर्भवती महिलेला वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात कोपरगाव ग्रामीण रुग्णालय प्रशासनाकडून दिरंगाई करण्यात आली. त्यामुळे अंत्यवस्थ असणाऱ्या त्या गर्भवती महिलेला व तिच्या पतीला मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अशा आशयाच्या बातम्या विविध प्रसिद्धी माध्यमांनी प्रसिद्ध केल्या होत्या.

त्या बातम्यांची आ.आशुतोष काळे यांनी दखल घेवून जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्याशी संपर्क करून त्यांना या घटनेची शहनिशा करून व सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.

# शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमांतर्गत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

## जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये लोकप्रतिनिधीसह सनदी अधिककाऱ्यांनी केले नवागतांचे स्वागत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** शाळा प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमांतर्गत जिल्हाभरातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन मोठ्या उत्साहाच्या वातावरणात स्वागत केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना समग्र शिक्षाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बुट, पायमोजे आदींचे वितरणही करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी मान्यवरांनी केलेल्या स्वागताने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता.



जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखलपात्र ५९ हजार ५२७ विद्यार्थ्यांपैकी ३५ हजार ३०९ विद्यार्थी तर इतर व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये १९ हजार २१७ शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थी दाखल झाले.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी राहाता येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. हंगा येथील शाळेमध्ये खासदार निलेश लंके यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शेवगाव तालुक्यातील वरुर येथील शाळेत आमदार मोनीका राजळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार किरण लहामटे यांनी अकोले तालुक्यातील कातळापूर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार मोनिका राजळे यांनी शेवगाव तालुक्यताल वरुर येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार हेमंत ओगले यांनी श्रीरामपूर व राहूरी येथील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार विठ्ठलराव लंघे यांनी नेवासा तालुक्यातील गेवराई येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार काशिनाथ दाते यांनी टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार विक्रम पाचपूते यांनी श्रीगोंदा येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी अहिल्यानगर तालुक्यातील निंबोडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी डॉ. आशिया यांच्या हस्ते 'इन्फोसिस स्प्रीनबोर्ड- मेकर लॅब ऑन व्हील्स' या उपक्रमाचा शुभारंभही करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी भोरवाडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले तर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी बुऱ्हाणनगर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

शाळा प्रवेशोत्सवप्रसंगी जिल्हा परिषदेचे सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व विभागांचे विभागप्रमुख, तालुकास्तरावरील तहसिलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांनी ३०४ शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. नवागतांच्या स्वागतासाठी रांगोळी, वर्ग सजावट करण्यात आली होती. गावा-गावातून प्रभातफेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. पहिले पाऊल उपक्रमांतर्ग इयत्ता १ लीच्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेऊन पालकांना त्यांची प्रतही देण्यात आली.

लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी समारंभपूर्वक केलेल्या स्वागतामुळे सर्व विद्यार्थी आणि पालक भारावून गेले होते. या स्वागतामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधानाचे भाव स्पष्ट दिसत होते.













## नवीन सीबीएससी पॅटर्नमुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडतील

### नायब तहसीलदार दिग्विजय पाटील । पाथर्डीतील पीएमश्री शाळेत प्रवेशोत्सव साजरा

**पाथर्डी । वीरभूमी –** नवीन सीबीएससी पॅटर्न ुसार शिक्षण पद्धतीमुळे आता ाज्यात शिक्षण क्षेत्रात ही मोठे दल घडतील. स्पर्धात्मक युगात टेकण्यासाठी विद्यार्थांना या शिक्षण द्धतीचा मोठा उपयोग होणार आहे. ाज इतर माध्यमाच्या शिक्षणापेक्षा ातृभाषेतून शिक्षण घेण्याकडे वेद्यार्थी व पालकांचा ओढा वाढत ालला असून यामुळे जिल्हा रिषदेच्या शाळेची पटसंख्या वाढत ाहे हे येथील शैक्षणिक दर्जा व शिक्षकांचे यश आहे. गुणवत्तापुर्ण दर्जेदार शिक्षणासाठी प्राथमिक शिक्षक विशेष मेहनत घेत आहेत. ासे प्रतिपादन पाथर्डीचे नायब हसिलदार दिग्विजय पाटील यांनी ाढले.



शहरातील पीएमश्री जिल्हा रिषद प्राथमिक केंद्र शाळा येथे ्तन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या वागत समारंभ व पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्याध्यापिका नंदा तुपे, ग्राम विकास अधिकारी मगर भाऊसाहेब, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा जयश्री काळोखे, उपाध्यक्ष सीमा केदारी, शिक्षिका शोभा फुंदे, वैशाली जायभाय, सुरेखा बडे, ज्योती जाधव, भावना देवरे, मनीषा फटांगरे आदींसह पालक उपस्थित होते.

यावेळी नुतन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन औक्षण करत चिमुकल्या मुलांचे कुंकुवाने पायाच्या पाऊलखुणा घेत सोन्याच्या व लक्ष्मीच्या पावलांनी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला होता व संपूर्ण शाळा सजावट करण्यात आली होती. फुलांची रांगोळी व नवगतांवर फुलाचा वर्षाव करण्यात आला. यावेळी सर्वत्र उत्साहाचे आनंदाचे वातावरण बनले होते यावेळी विद्यार्थ्यांना चॉकलेट व खाऊचे ही वाटप करण्यात आले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरण करण्यात आली. यावेळी पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी पाटील यांनी शाळेच्या मागील वर्षी मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा, पीएमश्री शिक्षण योजना, समग्र शिक्षा अभियान, मुल्यवर्धित शिक्षण, क्रिडा व सांस्कृतीक उपक्रम, विज्ञान उपक्रम, सहल व इतर शिक्षण योजना अंतर्गत शाळेनी केलेल्या उल्लेखनीय उपक्रमांची, डिजीटल क्लास रूमची, शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशीप व इतर स्पर्धा परिक्षेत मिळवलेले यश आदींची माहिति घेत व पाहणी करून समाधान व्यक्त करत शिक्षकांचे अभिनंदन करत कौतुक केले. आज सर्व मुलांना शाळेत मिष्टान्न भोजन देण्यात आले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदा तुपे, स्वागत ज्योती जाधव, सुत्रसंचालन भावना देवरे यांनी केले तर आभार सुरेखा बडे यांनी मानले.

## पाथर्डी शहरातील केंद्रीय प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव

**● पाथर्डी । वीरभूमी –** जिल्हा परिषद शाळांचा दर्जा व शैक्षणिक गुणवत्ता ही इतर माध्यमांच्या शाळेच्या तुलनेने उत्कृष्ठच आहे. प्राथमिक शाळेत शिक्षणाचा पाया भक्कम झाला तर भविष्यात कोणत्याही क्षेत्रात अडचण येत नाही. आजचा बालक हा उद्याचा उज्वल व प्रगतीशील भारताचा सुजाण नागरिक आहे म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षण घेऊन भविष्यात आपल्या शिक्षकाचे, आई-वडिलांचे व देशाचे नाव उज्वल करावे असे प्रतिपादन नायब तहसीलदार दिग्विजय पाटील यांनी केले.



शहरातील केंद्रीय जि.प. प्राथमिक शाळा (मुली) येथे नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव व पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रम वेळी पाटील बोलत होते त्यांनी सर्व बाल विद्यार्थीनींना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्यध्यापिका रत्नप्रभा मंहाडुळे, शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा जयश्री बाफना, शिक्षिका श्रीमती शिला नागरे, अनुराधा तरवडे, मीना ठोंगिरे, लता भंडारे, अर्चना खाडे, दिपाली भोसले तसेच बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे उत्साही वातावरणात स्वागत करताना शाळेच्या परिसरात उत्साह पाहायला मिळाला. सुंदर व आकर्षक रांगोळ्यांसह पुष्पपर्णांची सजावटीने शाळा सजवली होती. शाळेच्या पहिल्या दिवसाची घंटा वाजताच आलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब फुले आणि मिठाई, चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांचे औक्षण, फुगे, चॉकलेट, मिठाई देत तर काही विद्यार्थ्यांचे लक्ष्मीच्या पावलांनी स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीच्या वर्गात सुमारे ३५ मुलींनी प्रवेश घेतला. तर शाळेच्या पटानुसार सुमारे १५० मुलींना गणवेश, शुज, पाठयपुस्तके व इतर शालेय साहित्य वाटण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. आज विद्यार्थ्यांना गोड जेवण देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनुराधा तरवडे सूत्रसंचालन दिपाली भोसले यांनी तर आभार रत्नप्रभा महांडुळे यांनी मांनले.

# आदर्शगाव हिवरेबाजार मध्ये पद्मश्री पोपटराव पवार यांचेकडून नवागतांचे स्वागत

आदर्शगांव हिवरेबाजार जि.प.प्राथमिक शाळा आणि यशवंत माध्यमिक विद्यालय या शाळेत सोमवार (दि.१६) शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत करण्यात आले.

यानिमित्ताने शाळेत इयत्ता पहिली, पाचवी, आठवी आणि इतर वर्गात प्रथमच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि रंगीबेरंगी फुगे देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक ठाणगे, प्रास्ताविक विजय ठाणगे यांनी केले. उपस्थित विद्यार्थ्यांना शालेय मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच पाटी पेन्सिल, पट्टी, अंकलिपी, आणि गोड जेवणही देण्यात आले.

यावेळी बोलताना पद्मश्री डॉ. पोपटराव पवार म्हणाले की, नवागतांना शाळेची भीती वाटते आणि कुतुहलही वाटते. यावेळी पवार यांनी पूर्वीचे शाळेचे अनुभव कथन केले, पूर्वी शाळांना शेणाने सारवले जायचे, पूर्वी दहावीपर्यंत शाळेत जातांना चप्पल, फुल पॅन्ट नसायची, अकरावीला गेल्यावर स्लीपर आणि फुल पॅन्ट मिळायची तसेच मुलांना हरिपाठ, वृक्षारोपण, सहल, खेळ इ. विषयांचे मार्गदर्शन केले, तर व्यसन आणि मोबाईल पासून दूर राहण्यास सांगितले. चांगले संस्कार, चांगला आहार, वैयक्तिक स्वच्छता, पैशांची बचत इत्यादी नाविण्यपूर्ण बाबींचे मुलांना मार्गदर्शन केले.यावेळी नगरचे तहसीलदार राजेंद्र शिंदे, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समितीचे वसंत बिनवडे व सर्व स्टाफ,सरपंच विमलताई ठाणगे, अध्यक्ष अर्चना ठाणगे, सहदेव पवार, एस.टी पादीर, रो.ना. पादीर, दत्तात्रय ठाणगे, पालक, ग्रामस्थ व सर्व शिक्षक उपस्थित होते.

